# गरजूंची सेवा करण्यासाठी मेंढपाळांनी सेवक नेमले

## ख्रिस्ती मंडळयांमध्ये दोन प्रकारचे सेवक असतात: स्तेफन आणि फीबी यांच्यासारखे वडील आणि सेविका

मुलांना शिकवणाऱ्यांनी D1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू येशू तुझ्या शरीररूपी मंडळीत सेवक तयार कर आणि त्यांची नेमणूक करून गरजूंची सेवा करताना त्यांना प्रोत्साहन देण्यास आमचे साहाय्य कर."

**1. सेवकांची नेमणूक करून प्रोत्साहन देण्यासाठी देवाच्या वचनातून तयारी करा.**

**पाहा प्रे. कृ. 6:1-6 मध्ये** *(उत्तरे तिरप्या टाईपात दिली आहेत)*

- वडीलांचे मुख्य काम आणि सेवकांचे मुख्य काम.

*(वडील देवाच्या वचनाची सेवा करतात तर सेवक व्यावहारिक गरजा पूर्ण करतात)*

- विश्वासणाऱ्यांची सेवक म्हणून नेमणूक कशी होते.

*(मंडळी त्यांची निवड करते आणि पुढारी त्यांच्यावर हात ठेवतात)*



**पाहा रोम 16:1-2** मध्ये प्रेषितांना सेवकांविषयी काय वाटले.....

- स्त्रीला सेविका होता येते का? *(वचन 1)*
- फीबीचा नावलौकीक कसा होता? *(वचन 2)*

**पाहा फिलिप्पै 1:1-2** मध्ये फिलिप्पै येथील मंडळीतील दोन प्रकारचे सेवक *(वडील आणि सेवक)*

**पाहा 1 तीमथ्य 3:8-13 मध्ये**

- सेवकांची निवड करण्यासाठी काही पात्रता निकष *(वचने 8-11)*
- सेवक म्हणून सेवा करताना मिळणारे प्रतिफळ *(वचने 12-13)*

**पाहा 1 पेत्र 4:8-11 मध्ये**

- आध्यात्मिक कृपादानांचे दोन वर्ग *(बोलणे व सेवा करणे)*
- सेवक येशूच्या कोणत्या आज्ञेचे पालन करतात *(प्रीती)*
- सेवक म्हणून सेवा करणाऱ्यांना देव काय देतो. *(कृपा आणि सामर्थ्य)*

**2. सेवकांची नेमणूक व प्रोत्साहन यावर तुमच्या सहकाऱ्यां बरोबर योजना आखा.**

तुमच्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन प्रार्थना करा की प्रभूने सेवक तयार करावेत जे प्रभुकडून मिळणाऱ्याने आनंदाने व सामर्थ्याने गरजूंची सेवा करतील.

तुमच्या मंडळीला पूर्ण करता येतील अशा विश्वासणाऱ्यांच्या आणि समाजाच्या व्यावहारिक गरजांचा आढावा घ्या.

काही विश्वासणाऱ्यांकडून तुमच्या कानांवर तक्रारी आल्या असतील तर त्यांच्या समस्या सोडण्यासाठी काय करता येईल आणि कोण मदत करील याबाबत एकत्र येऊन चर्चा करा.

तुम्ही सर्वजण मंडळीसाठी करीत असलेल्या व्यावहारिक गोष्टींविषयी एकत्र येऊन चर्चा करा. जसे तुम्हांला व तुमच्या सहकाऱ्यांना एवढे काम असते की पवित्र शास्त्र शिकायला वेळ नाही सर्व विश्वासणाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास फुरसत नाही आणि मंडळीची वाढ कशी होईल याची योजना आखण्यास सवड नाही.

इतरांची सेवा करण्याचे कृपादान आणि आस्था असणाऱ्या विश्वासणाऱ्यांसंबंधी एकत्रितपणे चर्चा करा. मग अशा विश्वासणाऱ्यांसाठी त्यांची नावे घेऊन प्रार्थना करा.

विश्वासणारे आणि समाजातील लोकांच्या व्यावहारिक गरजा पूर्ण करण्यासाठी अशा विश्वासणाऱ्यांचे काय स्वप्न आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधून बोला.

**सावधानता बाळगा:** विश्वासणाऱ्यांना विनावेतन तुमच्या बागेत किंवा व्यवसायात कशा प्रकारे काम करायला येईल अशी योजना करू नका.

**3. आगामी उपासना सभेविषयी तुमच्या सहकाऱ्यां बरोबर योजना आखा.**

**प्रे. कृ. 6:1-6** मधून आरंभीच्या सेवकांचा वृत्तांत्त वाचा किंवा सांगा.

मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका व प्रश्न सादर करण्यास सांगा.

वर भाग 1 मध्ये दिलेले काही शास्त्रभाग घेऊन गरजूंची सेवा करणाऱ्या सेवकांविषयी नवा करार काय शिकवतो त्याची विश्वासणाऱ्यां बरोबर उजळणी करा.

**प्रे. कृ. 9:36-42** मधून दुर्कसचा कथावृत्तांत्त वाचा किंवा सांगा. गरजूंची सेवा करण्यात आनंद मानणाऱ्यांच्या द्वारे लोकांची सेवा करणे प्रभू येशूला कसे आवडते याविषयी चर्चा करा.

इतर विश्वासणाऱ्यांनी कशा प्रकारे सेवा केली हे सांगणाऱ्या साक्षी विश्वासणाऱ्यांनी द्याव्यात.

एखादा विश्वासणारा सेवक म्हणून सेवा करण्याचे मान्य करतो तेव्हा तुम्ही व वडील जन उपासने मध्ये त्याच्यावर आपले हात ठेवून प्रार्थना करा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी वाचा मार्क 10:43-45

**पाठ करा मार्क 10:45**

दोन वा तीन जणांचे लहान लहान गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. योजना बद्ध कार्यक्रम ठरवा आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net